## आतील पानात वाचा


- महाराष्ट्राच्या राजकारणाचे कटू-सत्य..?
- शिक्षकाची सेवानिवृत्ती, थांबा नव्हे, नवी सुरुवात...
- कर्जमाफीतील जाचक अटी तातडीने रद्द करा अन्यथा भूमिपुत्र तीव्र आंदोलन करणार...



दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजीनगर
छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती, संचलित
कला विज्ञान व वाणिज्य निवासी महाविद्यालय
ता.सोयगांव जि.छत्रपती संभाजीनगर
मा.खा.रावसाहेब पाटील दानवे (अध्यक्ष) (माजी रेल्वे, कोळसा व खान केंद्रीय राज्यमंत्री)
मा.सौ.निर्मलाताई रावसाहेब पा.दानवे (सचिव) (छ.श्री.शिवाजी महाराज स्मारक समिती भोकरदन)
मा.आ.संतोष रावसाहेब पा.दानवे (भोकरदन जाफ्राबाद विधानसभा)
BA, Bcom, Bsc First Year विद्यार्थ्यांसाठी १५ जून २०२६ पासून प्रवेश सुरु
श्री.विजय देसाई : 9403251705



वर्ष : ०५ | अंक : २९६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०७ जून २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# दुर्गराज रायगडावर शिवराज्याभिषेक दिनाचा दिमाखदार सोहळा

**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.०६, रायगड :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर आज इतिहास, परंपरा आणि शिवभक्तीचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. संभाजीराजे छत्रपती व त्यांच्या सुविद्य पत्नी संयोगिताराजे भोसले आणि जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशभरातून हजारो शिवप्रेमींनी उपस्थिती लावली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण रायगड परिसर दुमदुमून गेला.

यावेळी आमदार संजय चव्हाण, आमदार अभिजित पाटील, नवनिर्वाचित आमदार अनिकेत तटकरे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उप जिल्हाधिकारी रवींद्र शेळके यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

शिवराज्याभिषेक दिनी सकाळी ७ वाजता नागारखान्यात युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या शुभहस्ते पारंपरिक वाद्यांच्या गजरात ध्वजारोहण संपन्न झाले. सकाळी ७.३० वाजता राजसदर येथे शाहिरी कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीचे राजसदरावर आगमन झाले. त्यानंतर युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांचे आगमन झाले आणि त्यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या उत्सवमूर्तीचा अभिषेक करण्यात आला. श्री शिवछत्रपती महाराजांच्या राजसदरेवरील सिंहासनारुढ मूर्तीस सुवर्ण मुद्रांचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर पोलीस दलाच्या वतीने शासकीय मानवंदना देण्यात आली.

युवराज संभाजी छत्रपती महाराज शिवभक्तांना संबोधित केले. शिवराज्याभिषेक







पालखी सोहळ्यास प्रारंभ होऊन जगदीश्वर मंदिरात पोहचली. जगदीश्वर मंदिर येथे युवराज संभाजी छत्रपती महाराज यांच्याकडून वारकरी संप्रदायाला पंढरपूर वारीसाठी मानाचा ध्वज प्रदान करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराजांना सामूहिक अभिवादन करण्यात आले.

नियोजित कार्यक्रमानुसार सकाळी पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम, मर्दानी खेळ आणि भगव्या पताकांनी सजलेल्या या मिरवणुकीने शिवभक्तांमध्ये विशेष उत्साह निर्माण केला. त्यानंतर राजसदरावर आयोजित मुख्य सोहळ्यात संभाजीराजे छत्रपती यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

दुपारी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, पोवाडे, कीर्तन, शिवचरित्रावर आधारित व्याख्याने आणि लोककलांचे सादरीकरण करण्यात आले. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमांना शिवभक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पारंपरिक वेशभूषेतील युवक-युवती, मावळे आणि विविध सामाजिक संस्थांच्या सहभागामुळे संपूर्ण रायगड परिसर शिवकालीन वातावरणाने भारावून गेला होता.

सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले होते. शिवप्रेमींसाठी मोफत बससेवा, अन्नछत्र, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छता व्यवस्था, सावलीसाठी मंडप आणि आपत्कालीन सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. किल्ल्यावर कडक पोलीस बंदोबस्त ठेवून सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात आली.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांसह होळीचा माळ येथील नियंत्रण कक्ष, जगदीश्वर मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी, राजसदर आणि अन्नछत्राची पाहणी करून व्यवस्थेचा आढावा घेतला. त्यांनी शिवभक्तांशी संवाद साधून त्यांच्या सोयी-सुविधांची विचारपूस केली तसेच सर्व यंत्रणांना आवश्यक सूचना दिल्या.

## शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागाने रायगड शिवमय

स्वराज्याच्या वैभवशाली इतिहासाचे स्मरण करून देणारा आणि शिवरायांच्या विचारांचा जागर करणारा हा शिवराज्याभिषेक सोहळा अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. दुर्गराज रायगडावर आज पुन्हा एकदा शिवकालीन तेज, शौर्य आणि स्वाभिमानाचा जागर अनुभवायला मिळाला.

# महाराष्ट्रात मान्सून धडकला, शेतकरी राजा सुखावला!

## लवकरच राजधानी मुंबईसह राज्यात बरसणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, मुंबई :** अखेर महाराष्ट्राच्या उंबरठ्यावर मान्सूनचे आगमन झाले आहे. भारतीय हवामान विभागाने शनिवारी मान्सूनने तळकोकणात प्रवेश केल्याची अधिकृत घोषणा केली. गोवा पूर्णपणे व्यापल्यानंतर मोसमी वाऱ्यांनी दक्षिण कोकणात हजेरी लावली असून आता मुंबईसह राज्याच्या उर्वरित भागाकडे त्यांची वाटचाल सुरू झाली आहे. त्यामुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा मिळण्याची चिन्हे आहेत.



यंदा मान्सूनचे केरळमध्ये आगमन नेहमीपेक्षा तीन दिवस उशिराने झाले. ४ जून रोजी केरळ किनारपट्टीवर दाखल झालेल्या मान्सूनने त्यानंतर वेग पकडला. अवघ्या दोन दिवसांत त्याने कर्नाटक, तामिळनाडू, गोवा आणि अरबी समुद्रातील आणखी काही भाग व्यापत महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत मजल मारली. हवामान विभागाच्या ताज्या माहितीनुसार, सध्या मान्सूनच्या पुढील प्रगतीसाठी वातावरण अनुकूल आहे.

**मुंबईकडे लक्ष!**

मान्सून तळकोकणात दाखल झाल्यानंतर पुढील टप्पा मुंबई आणि उत्तर कोकणाचा असतो. अनेकदा दक्षिण कोकणात आगमन झाल्यानंतर मान्सून वेगाने पुढे सरकतो. त्यामुळे मुंबईतही लवकरच मान्सून दाखल होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. काही भागांत पावसाचा जोर वाढण्यासह वाऱ्याचा वेगही वाढू शकतो.

**उष्णतेनंतर दिलासा**

एप्रिल आणि मे महिन्यात राज्यातील अनेक भागांना तीव्र उष्णतेचा सामना करावा लागला. विशेषतः विदर्भात उष्णतेच्या लाटेसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. अधूनमधून झालेल्या वादळी पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष मान्सूनकडेच लागले होते. आता अधिकृत प्रवेश झाल्याने खरीप हंगामाच्या तयारीलाही गती मिळण्याची अपेक्षा आहे.

**गेल्या वर्षीपेक्षा वेगळी स्थिती**

गेल्या वर्षी मान्सूनने २४ मे रोजी केरळमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी तो तळकोकणात पोहोचला आणि २६ मे रोजी मुंबईत दाखल झाला होता. यंदा केरळमध्ये आगमन उशिरा झाले असले तरी पुढील प्रवास तुलनेने वेगाने होताना दिसत आहे. दरम्यान, जून महिन्यात राज्यात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता हवामान विभागाने यापूर्वी व्यक्त केली आहे. त्यामुळे मान्सूनची पुढील वाटचाल आणि आगामी पर्जन्यमान कसे राहणार, याकडे शेतकऱ्यांसह संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# जंतरमंतरवर कॉकरोच जनता पार्टीचं पहिलं आंदोलन

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०६, नवी दिल्ली :** कॉकरोच जनता पार्टीनं जंतरमंतरवर आंदोलनाची हाक दिली होती. या आंदोलनाला पक्षाचे संस्थापक अभिजीत दिपके उपस्थित होते. या आंदोलनाला हजारो तरुण उपस्थित होते. नीट पेपर लीक प्रकरणी केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी दिली. यावेळी काही आंदोलकांनी झुरळ्यांचे फोटो असलेले टी शर्ट्स परिधान केले होते. तर काहींनी झुरळांचे फोटो असलेले मास्क घातले होते. आंदोलन सुरू असताना तिथे एक जण हातात हिट स्प्रे घेऊन पोहोचला. त्यामुळे आंदोलनस्थळी काही वेळ गोंधळ उडाला.

आंदोलनस्थळी पोहोचलेल्या तरुणाच्या हातात एक फ्रेम होती. त्यात कॉकरोच जनता पार्टीचा लोगो होता. तरुणानं त्या फ्रेमवर हिट स्प्रे फवारुन सीजेपी आणि त्यांच्या समर्थकांवर निशाणा साधला. 'सोशल मीडियावर कॉकरोच जनता पार्टीचे कोट्यवधी पाठीराखे असल्याचं सांगितलं जातं. पण आंदोलनस्थळी अतिशय मोजके लोक दिसले. मग दोन कोटी फॉलोअर्स असल्याचा दाव्याचं नेमकं काय झालं,' असा खोचक सवाल त्यांनी विचारला. या आंदोलनाच्या माध्यमातून देशाला चुकीच्या दिशेनं नेलं जात असल्याचा आरोप करत संबंधित व्यक्तीनं आंदोलनाला विरोध दर्शवला. भारतात






नेपाळ आणि बांगलादेशासारखी स्थिती निर्माण होऊ नये, असं त्यानं म्हटलं. त्याच्या सोबत असलेल्या व्यक्तींनी आंदोलनाला 'फ्लॉप' म्हटलं. आपला भाजप किंवा अन्य कोणत्याही अन्य राजकीय पक्षाशी संबंध नसल्याचं त्यांनी सांगितलं.

सीजेपी समर्थक आणि आंदोलक विरोधक आमनेसामने येताच वातावरण तापलं. दोन्ही बाजूंनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केले. त्यांच्याकडून एकमेकांच्या दाव्यांवर आणि हेतूंवर शंका, प्रश्न उपस्थित करण्यात आले. तिथे उपस्थित असलेले पोलीस आणि सुरक्षा कर्मचारी परिस्थितीवर नजर ठेवून होते.

आमचं आंदोलन विद्यार्थी आणि तरुणांच्या भविष्याशी संबंधित असल्याचं सीजेपी समर्थकांनी म्हटलं. सरकार विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत असल्याचा आरोप त्यांनी केला. शिक्षण व्यवस्थेशी संबंधित आमच्या मागण्या गांभीर्यानं ऐकून घ्यायला हव्यात, असा आग्रह आंदोलकांनी धरला.

कॉकरोच जनता पार्टीच्या सदस्यांनी शनिवारी जंतरमंतरवर आंदोलन केलं. या पक्षाचं हे पहिलंच आंदोलन होतं. पक्षाचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी आंदोलनाचं नेतृत्व केलं. त्यासाठी ते आज अमेरिकेहून भारतात दाखल झाले होते. या दरम्यान दिल्लीत कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.




## जीवन म्हणजे एक संघर्ष

या भूतलावर जेवढे सजीव जन्माला येतात त्या प्रत्येक सजीवाचे जीवन एक संघर्ष असतो.विशेष म्हणजे मनुष्य जातीसाठी जीवन आगळावेगळा संघर्ष असतो. ज्याच्या जीवनात संघर्ष नसतो त्याच्या जीवनाला काही अर्थ नसतो. ज्यांच्या जीवनात नेहमीच संघर्ष असतो त्यांच्या जीवनाला विलक्षण अर्थ प्राप्त होतो.जे कोणी तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला येतात त्यांना संघर्ष करावा लागत नाही.कारण सगळे वैभव त्यांच्या पायावर लोटांगण घालत असते. एका सामान्य कुटुंबात किंवा गरीबांच्या घरात ज्यांचा जन्म होतो त्यांच्या जीवनातील संघर्ष कधीच संपत नाही. कितीही कष्ट करा,कितीही प्रामाणिक जीवन जगा,चारित्र्याला कितीही जपा जीवनात स्थैर्य येत नाही,सुखाचे ताट समोर कधीच दिसत नाही.खरंच, प्रत्येकाचे जीवन एक संघर्ष असतो. हेच मनुष्य जीवनाचे खरे सार आहे.

संत असोत,महामानव असोत, स्वातंत्र्यसैनिक असोत,विचारवंत असोत की समाजसुधारक असोत यांचा जीवन संघर्ष इतरांना प्रेरणा देणारा असतो. सर्व सामान्य लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी जे कष्ट सोसले असतात,त्यांनी जो संघर्ष केलेला असतो तो खूप विलक्षण आणि प्रेरणादायी असतो.शेतकऱ्यांचा जीवन संघर्ष फार खतरनाक असतो.शेतकरी रात्रंदिवस मुक्या जनावरांसारखे शेतात राबतात,त्यांचे संपूर्ण आयुष्य शेतात घाम गाळण्यात जाते.कडक उन्हाळा, मुसळधार पावसाळा आणि रक्त गोठवणारा थंड हिवाळा असला तरीही जीवाची पर्वा न शेतकरी शेतात काम करीत राहतात.तरीही त्यांच्या जीवनात कधीच सुखाचे दिवस आलेले दिसत नाहीत.त्यांच्या जीवनाचा शेतात शेवट होतो पण संघर्ष कधीच संपत नाही. आजकाल विविध स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या आणि नोकरीला लागलेल्या तरुणांचे व तरुणींचे सत्कार करतानाचे फोटो सोशल मीडियावर झळकत आहेत.त्यांचे मित्र व नातेवाईक अभिनंदन करायला सगळे पुढे येतात. त्यांचे तोंडभरून कौतुक करतात. आपणाला त्यांचे यश ठळकपणे दिसते परंतु त्यांनी केलेला संघर्ष आपण कधीच पाहिलेला नसतो.आय आय टी इंजिनिअर होण्यासाठी,मोठा अधिकारी होण्यासाठी आणि डॉक्टर होण्यासाठी ज्या स्पर्धा परीक्षा द्यावा लागतात त्यांचा त्यांना किती अभ्यास करावा लागतो हे आपण नेहमी पाहतो.कष्ट केल्या शिवाय आणि घाम गाळल्या शिवाय यश पदरात पडत नाही हे सत्य नाकारता येत नाही. म्हणून तर मानवी जीवनात संघर्षाला खूप मोठे स्थान आहे. यशस्वी खेळाडूंचे,यशस्वी फिल्मी कलाकारांचे आणि नामवंत लेखक व कवींचे आपण फार मोठे फॅन असतो. पण एका विशिष्ट काळापर्यंत त्यांनी केलेला खडतर संघर्ष आपण कधीच बघितलेला नसतो.पतीचे आकस्मिक निधन झाल्यानंतर काही जिगरबाज एकल माता आपल्या लेकरांसाठी जो संघर्ष करतात तो अतिशय थक्क करणारा असतो.कॅंसर सारख्या जीवघेण्या आजारांना न घाबरता काही योद्धे स्थिर मनाने व निश्चयी बाण्याने आपला जगण्याचा संघर्ष चालू ठेवतात आणि एक दिवस त्या रोगाला कायमचे पळवून लावतात.क्रिकेटर युवराज सिंग, फिल्मी कलाकार सोनाली बेंद्रे,मनिषा कोईराला यांनी जीवनात असा लढा लढला आहे आणि आज ते यशस्वी झाले आहेत.परंतु,खेदाची बाब अशी की काही व्यक्ती अपयशाला घाबरून, जीवनात आलेल्या संकटाला भिऊन, आजाराला कंटाळून आणि कर्जबाजारी पणामुळे हाय खाऊन आत्महत्या करतात.आत्महत्या करणे पळपुटेपणाचे लक्षण आहे.जीवन एक रणांगण आहे, तेथे कणखरपणे लढायचे असते,मैदान सोडून पळायचे नसते. लोक काय म्हणतील?या वाक्याला भ्यायचे नसते.

जीवनात कोणीही परिपूर्ण नाही.कोणी कायमस्वरूपी सुखी नाही.प्रत्येक व्यक्ती किमान एका दुःखाने खंगलेला असतो. पण निडरपणे जीवन जगत असतो. कारण त्याला माहित असते की दुःखाचे दिवस आज ना उद्या संपणार आहेत, आणि सुखाचे दिवस येणार आहेत. आपण एकटेच या जगात दुःखी नाही तर आपल्या पेक्षा जास्त दुःखी लोक या जगात आहेत हे मनाला समजावून सांगतो.म्हणून तो कधीच संघर्ष करणे सोडत नाही.

तात्पर्य हेच की जीवनात आलेल्या संकटाला घाबरुन व दुःखाला भिऊन रडत बसू नका.सकारात्मक वृत्ती बाळगा,लढत राहा,संघर्ष करत राहा. जीवन एक संघर्ष आहे याचा कधीच विसरू होऊ देऊ नका.नेहमी आनंदाने जगत राहा आणि हे गाणे गुणगुणत राहा...

समय का दर्या बहता जाए
बहता बहता कहता जाए
जीवन एक संघर्ष है...
जीवन एक संघर्ष है...

**- बबन गुळवे**

# महाराष्ट्राच्या राजकारणाचे कटू-सत्य..?




**रविवार विशेष (कव्हर स्टोरी)**

एखादी मिठी ही हवीहवीशी असते तर एखाद्या मिठीत जीव गुदमरतो. ही भावना काल्पनिक किंवा भावनिक नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील अत्यंत तीव्र राजकीय वास्तव आहे. महाराष्ट्रात भाजप आणि शिवसेना यांचा संसार फार सुखाने सुरू आहे असे दिसत नाही. दोन्ही पक्ष सत्तेत सोबत आहेत, पण मनाने एकत्र आहेतच असे चित्र नाही. विधान परिषदेच्या जागावाटपांची चर्चा उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होती. हा विषय महाराष्ट्रात सुटू शकला नाही, एवढा ताणला गेला.

या मिठीत जीव गुदमरतोय अशी एकंदर भावना शिवसेनेच्या नेत्यांकडून व्यक्त होऊ लागली. 'शिवसेनेला स्लो पॉयझन दिलं जातंय', असं आता शिवसेनेच्या आमदारांकडून म्हटलं जात आहे. यावरून महाराष्ट्रात भाजपसोबतच्या राजकारणात आता नेत्यांचा जीव गुदमरतोय, हे अत्यंत तीव्र राजकीय वास्तव अधोरेखित होत आहे. २०१४ पासून ते २०२२ च्या सत्तांतरापर्यंत आणि आता २०२६ च्या बदललेल्या राजकीय पटलावर, भाजपसोबतच्या 'महायुती'त एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेची अवस्था केविलवाणी झाली आहे का, त्यांना निर्णयस्वातंत्र्य राहिले नाही का, त्यांना त्यांचे उमेदवार आणि मतदारसंघ ठरवण्याचाही अधिकार महायुतीत उरला नाही, असे वास्तव समोर येत आहे.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या काळात शिवसेना हा महाराष्ट्रात 'मोठा भाऊ' आणि भाजप 'छोटा भाऊ' असे समीकरण होते. मात्र, २०१४ नंतर हे चित्र पूर्णपणे बदलले. महायुतीतील शिवसेनेला आता अस्तित्वाची लढाई लढावी लागत आहे. भाजप हा एक अत्यंत शिस्तबद्ध, विस्तारवादी आणि निवडणूक जिंकणारी मशिनरी असलेला पक्ष आहे. अशा पक्षासोबत जेव्हा एखादा प्रादेशिक पक्ष युती करतो, तेव्हा भाजप त्या पक्षाची जागा हळूहळू व्यापू लागतो. भाजपची राजकीय मिठी ही संबंधित पक्षांना मगरमिठी वाटायला लागते. 'आपलं मुंडकंच छाटलं जात आहे', एवढी तीव्र भावना जेव्हा नेते व्यक्त करतात तेव्हा त्यांच्या अस्तित्त्वाचाच प्रश्न जटिल झालाय हे लक्षात येतं. भाजपची ही 'राजकीय मिठी' इतकी घट्ट असते की, मित्रपक्षाला स्वतःचा स्वतंत्र विस्तार करण्यास जागाच उरत नाही. शिवसेनेला सतत भाजपच्या सावलीत आणि त्यांच्या रणनीतीनुसारच पावले टाकावी लागत आहेत, ज्यामुळे त्यांचा स्वायत्त श्वास गुदमरल्यासारखा वाटणे स्वाभाविक आहे. विधान परिषदेच्या १७जागांसाठी निवडणूक जाहीर झाल्यानंतर जिथे ज्यांचे सर्वाधिक मतदार तिथे त्या पक्षाला उमेदवारी हा सोपा फॉर्म्युला जर एकमताने मान्य केला गेला असेल तर मग कोकणची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाला कशी काय दिली जाते? जागावाटप आणि सत्तेचे असमान गणित महायुतीतील भाजपेतर पक्षांच्या नेत्यांना सोडवणे कठीण झाले आहे. महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्रीपद भाजपकडे आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीचे उपमुख्यमंत्री असले तरी सत्तेच्या खऱ्या चाव्या आणि पडद्यामागील निर्णयप्रक्रिया भाजपच्याच हातात राहिली आहे. प्रत्येक लहान-मोठ्या निर्णयासाठी, मंत्रिमंडळ विस्तारासाठी किंवा जागावाटपाच्या सूत्रासाठी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाच्या मंजुरीची वाट पाहावी लागते. दिल्लीश्वरांच्या दर्शनाशिवाय सन्माननीय तोडगा निघत नाही. तडजोड झाली तरी ती अडचणीची तडजोड असते. लोकसभा, विधानसभा निवडणुकांच्या जागावाटपात शिवसेनेला आपल्या हक्काच्या जागांवर पाणी सोडावे लागले किंवा भाजपच्या दबावामुळे उमेदवार बदलावे लागले. ही परिस्थिती म्हणजेच 'मिठीत जीव गुदमरण्याची' स्पष्ट लक्षणे आहेत. ही स्थिती फक्त शिंदेंच्या शिवसेनेची आहे असे नाही तर राष्ट्रवादी कॉंग्रेसची परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही.

नगरपालिका, महापालिकेपासून राज्यात आणि केंद्रात सत्ता असूनही निर्णय प्रक्रियेत सत्तेतील दोन्ही कनिष्ठ भावंडांना अधिकाधिक दुय्यम स्थान दिले जात आहे. हे राज्याचे सर्वोच्च पद भुषवलेल्या नेत्यांना सहन करावे लागत आहे. ते फक्त सत्तेचा आधार कमी होऊ नये म्हणून. पुण्याची जागा राष्ट्रवादीला हवी होती. येथे त्यांच्याकडे अनेक उमेदवार होते, मात्र भाजपमधून एक बडे कुटुंब राष्ट्रवादीत येतं आणि त्या कुटुंबातील मुलाला एका रात्रीतून उमेदवारी दिली जाते. हे कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेतृत्त्वाला सहजासहजी मान्य होईल असे नाही, पण महाराष्ट्र हे घडताना पाहात आहे. आयाराम, गयाराम यांना सध्या सुगीचे दिवस आले आहेत. राजकीय पक्षांना त्यांच्या आजी-माजी आमदार, खासदार, मंत्र्यांना सांभाळणे कठीण झाले आहे, तिथे कार्यकर्त्यांची दखल घेण्यासही फुरसत आहे का, हा प्रश्नच आहे.

एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) यांना भाजपची मिठी आता मजबुरी वाटायला लागली का? भाजपसोबत राहणे ही शिंदेंच्या शिवसेनेची एक 'अटळ मजबुरी' झाली आहे. सध्याच्या स्थितीत शिवसेनेचा दम नक्कीच गुदमरतो आहे, कारण त्यांना स्वतःच्या अटींवर राजकारण करता येत नाही. मात्र, या मिठीतून बाहेर पडणे त्यांच्यासाठी तितकेच धोक्याचे आहे, कारण बाहेर पडल्यास अस्तित्वाचा संघर्ष अधिक तीव्र होऊ शकतो. थोडक्यात सांगायचे तर, ही एक अशी 'राजकीय मिठी' आहे जी सुखावह नाही, पण ती सोडणेही आत्मघातकी ठरू शकते. म्हणूनच, सध्याची शिवसेना या मिठीत गुदमरत असली, तरी सत्तेच्या ऑक्सिजनवर स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहे, हेच महाराष्ट्राच्या राजकारणाचे आजचे कटू सत्य आहे.

**- ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी,**
**कागल-कोल्हापूर.**

## आयती संधी

नेत्यांच्या भोवताली
सारखी दाटली गर्दी
परिचीत रे थोडेफार
अनोळखीमात्रअर्धी

नेत्यांजवळ कोंडाळे
जशी वाहणारी नदी
धांदल गडबड उडते
फोटो मी काढू कधी

खेटू रेटून साहेबांशी
लगटचालली अगदी
कॅमेरे वळतात जसे
असू चेहऱ्या कागदी

फोटो व्हायरल त्वरे
हौशी कितीतरी दर्दी
कार्यक्रमात कोण ते
फिराया लागते यादी

नंतर कळते गर्दीमधे
हजर काही अपराधी
साहेबासोबत फोटोत
उभे ठाकले उग्र वादी

ब्रेकिंगन्यूजमिडीयास
लावावे लोकांनानादी
लागेबांधे गुन्हेगारांशी
चलारे हलवाया गादी

अप प्रचार शिगे पोचे
आयती मिळता संधी
गलिच्छ राज कारणी
सुसाटे अशुध्द आंधी

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# शिक्षकाची सेवानिवृत्ती : थांबा नव्हे, नवी सुरुवात


३१ मे रोजी शासनाच्या विविध कार्यालयांतील अनेक कर्मचारी सेवानिवृत्त झाले. तृतीय श्रेणीतील कर्मचारी ५८ वर्षे पूर्ण झाल्यामुळे, तर चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी वयाची साठी पूर्ण झाल्यामुळे सेवामुक्त झाले. अनेकांनी अश्रूनयनांनी आपल्या सहकाऱ्यांचा आणि कार्यालयाचा निरोप घेतला. हा दिवस भावनांनी ओथंबलेला होता. सेवानिवृत्त होणाऱ्यांचे मन दाटून आले होते. निरोप देणे नकोसे झाले होते. मनातील भावनांना वाट मोकळी करून देताना अनेकांच्या अश्रूंचा बांध फुटला.

माणसाचे जीवन हे गतिशील असते. या गतिशील जीवनात स्थैर्य आणि शिस्त येते ती नोकरीमुळे. नोकरीत कर्मचारी इतका गुरफटून जातो की, दररोजचे कार्यालयीन कामकाजच त्याचे जीवन बनून जाते. त्यातूनच तो स्वतःची ओळख निर्माण करतो. जीवनातील ३० ते ३५ वर्षे एखाद्या शासकीय कार्यालयात कशी भराभर निघून जातात, हे त्यालाही कळत नाही.

शिक्षकांसाठी तर सेवानिवृत्ती म्हणजे भरल्या घरातून निघून जाण्यासारखी असते. शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी, त्यांचे भावविश्व, त्यांचे हसरे चेहरे आणि त्यांच्याशी होणारा आदरयुक्त संवाद यापासून आता दूर व्हावे लागणार असते. विद्यार्थी घडवता घडवता स्वतःचे जीवन समृद्ध करून घेणारा शिक्षक आता त्या विद्यार्थीप्रेमाला मुकणार असतो.

अध्ययन-अध्यापन ही एक प्रयोगशील प्रक्रिया आहे. इतर कामकाजांच्या तुलनेत येथे नावीन्य, सर्जनशीलता आणि कलात्मकता जपण्याची मोठी संधी असते. शिक्षकांचा प्रत्येक दिवस नवीन असतो. आपल्यापेक्षा कमी वयाच्या विद्यार्थ्यांची बोलण्यातील चपळता, निरागसता आणि लडिवाळपणा हळूहळू शिक्षकाच्या स्वभावात उतरलेला असतो. त्यामुळे बाहेर कुठेही गेल्यावर त्याच्या मवाळ, प्रेमळ आणि मधुर बोलण्यामुळे, तुम्ही शिक्षक आहात का? असा प्रश्न सहज विचारला जातो.

समोरच्या व्यक्तीचा आदर राखणे, तिचे व्यक्तिस्वातंत्र्य जपणे आणि तिच्या भावनांना



हळुवार फुंकर घालणे, हे विद्यार्थ्यांशी नाते जपत असताना शिक्षकाच्या अंगवळणी पडते. मुले म्हणजे देवाघरची फुले असे म्हणतात. या फुलांचा सुगंध घेण्याची आणि त्यांना हळुवारपणे फुलवण्याची खरी कसोटी शिक्षकाचीच असते. ही फुले पुढे कोणत्या फुलदाणीत अधिक सुंदर दिसतील, यासाठी त्यांना घडवण्याचे कार्य शिक्षक करत असतो. कधी प्रेमाने तर कधी रागावून तो विद्यार्थ्यांना योग्य दिशा देत असतो.

सेवेनंतरचे जीवन कसे जगायचे, याचा ठोस आराखडा नसतानाच अनेकजण घरी परततात. पुढील दिवस काहीसे नकोसे वाटू लागतात. दिनचर्या बदलते. घरातील माणसे आणि बाहेरील समाज आपल्याला कितपत समजून घेईल, याचीही शाश्वती नसते. शिक्षक म्हणून आयुष्याचा बराच काळ विद्यार्थ्यांसोबत घालवल्यानंतर आपणदेखील त्यांच्यासारखेच निरागस झालो आहोत, याची जाणीव सेवानिवृत्तीनंतरच्या काही दिवसांत होऊ लागते.

समाज जेव्हा कठोर वास्तवाची जाणीव करून देतो, तेव्हा शाळेच्या चार भिंतीतील भावविश्व किती समृद्ध होते याची प्रकर्षाने जाणीव होते. आता कुटुंबाला भरपूर वेळ देता येईल, असे वाटते; परंतु त्यांनाही आपल्या सहवासाची किती गरज आहे, याचाही विचार करावा लागतो.

सेवानिवृत्तीनंतर काय करायचे? हा प्रश्न अनेकांना सतावत असतो. जीवन जिथे घेऊन जाईल तिकडे वाहवत जायचे की स्वतः काही नियोजन करायचे, हे प्रत्येकाने ठरवले पाहिजे. आपल्या आवडी-निवडी, छंद जोपासताना शरीर आणि मनाचे आरोग्य जपण्याचेही नियोजन आवश्यक असते.

जीवनप्रवासाची रेल्वे आता एका नव्या जंक्शनवर येऊन थांबलेली असते. येथून पुढे अनेक दिशांना जाण्याचे मार्ग खुले असतात. गाडी त्याच स्थानकावर कायम उभी ठेवणे योग्य नसते. म्हणूनच सेवानिवृत्ती म्हणजे थांबा नव्हे, तर नव्या प्रवासाची सुरुवात आहे, हा दृष्टिकोन स्वीकारला तर पुढील जीवन अधिक सुखी, समाधानी आणि समृद्ध होऊ शकते.

रोजचा हलकासा व्यायाम, चालणे, योगाभ्यास यांमुळे शरीर आणि मनाला उभारी मिळते. हलका आहार, पुरेशी झोप आणि नियमित दिनचर्या यांना प्राधान्य दिले पाहिजे. भेटीगाठी, गप्पागोष्टी आणि सामाजिक सहभाग यांमधून मनातील विचारांना अभिव्यक्त होण्याची संधी मिळते. सेवानिवृत्तीनंतर एखादा नवा उपक्रम हाती घेऊन तो यशस्वीपणे पूर्ण करण्याचा संकल्प केला, तर जीवनाला नवे अर्थ प्राप्त होतात.

वार्धक्य ही केवळ शारीरिक किंवा वैद्यकीय अवस्था नसून ती मानसिक आणि सामाजिक प्रक्रियादेखील आहे. या अवस्थेचा सकारात्मक स्वीकार करून मन, भावना आणि शरीर यांचा समतोल राखत जीवनाचा पुढील टप्पा आनंदाने जगण्यातच खरा शहाणपणा आहे.

जिंदगी के सफर में गुजर जाते हैं जो मकाम
वो फिर नहीं आते, वो फिर नहीं आते...

असं म्हणत सेवानिवृत्त होऊन घरी जात असताना,

सेवानिवृत्ती म्हणजे शेवट नव्हे; ती अनुभवांच्या शिदोरीसह सुरू होणारी जीवनाची दुसरी, अधिक समृद्ध आणि अर्थपूर्ण इनिंग आहे. हा दृष्टिकोन तयार केला तर अजून पुढे नवनवीन सुंदर मकाम भेटत जातील...

**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## सुंदरगडावर छत्रपती शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०६, पाटण :** किल्ले सुंदरगड (दातेगड) वर ३५३ वा छत्रपती शिवराज्याभिषेक दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. शिव मावळ्यांनी सकाळी गडाची स्वच्छता केली. सडा शिंपून रांगोळी काढण्यात आली. गडावरील देव दैवतांची पूजा करुन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पंचगंगा, दुग्धाभिषेक करण्यात आला व छत्रपती शिवरायांचा प्रतिमेवर पुष्पवृष्टी करुन राज्याभिषेक करण्यात आला. यावेळी शिवमावळ्यांनी शिवगर्जनेच्या घोषणा देऊन किल्ल्यावर ऐतिहासिक माहोल तयार केला. या शिवराज्याभिषेक सोहळ्याला शिवमावळ्यांसह बाल मावळे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा रायगडावर होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्या बरोबर पाटण महालातील प्रमूख असलेल्या किल्ले सुंदरगड - दाते गडावर छत्रपती शिवराज्याभिषेक दिन साजरा करण्याचा निर्णय गेल्या चार वर्षांपासून सुंदर स्वराज्य प्रतिष्ठान किल्ले सुंदरगड संवर्धन समितीच्या मावळ्यांनी घेतला. या निमित्ताने प्रतिष्ठानच्या मावळ्यांनी शनिवारी सकाळी गडावरील खंजीर दरवाजा, गजलक्ष्मी तलवार विहीर येथील स्वच्छता केली. येथील देव दैवतांना पंचगंगा, दुग्धाभिषेक करण्यात आला. छत्रपती शिवरायांचा प्रतिमेवर पुष्पवृष्टी करुन राज्याभिषेक करण्यात आला. यावेळी शिवम ावळ्यांनी शिवगर्जनेच्या घोषणा देऊन किल्ल्यावर इतिहासीक माहोल तयार केला. या शिवराज्याभिषेक सोहळ्याला शिवमावळ्यांसह बाल मावळे मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित शिवमावळ्यांनी शिवगर्जनेच्या घोषणा देत गड दणाणून सोडला. किल्ले सुंदरगडावरील छत्रपती शिवराज्याभिषेक सोहळ्यास शिवप्रेमी मनोहर यादव, शंकर मोहिते, लक्ष्मण चव्हाण, राजेंद्र मोरे, राम माळ, राम साळुंखे, संतोष मारसिंग, राजेंद्र पाटणकर, अनिल भोसले, पुण्यावरून समीर धायरकर, अशोक येवले, ईश्वरपुर यांच्यासह टोळेवाडी-घेरादातेगड, पाटण महालातील शिवमावळे मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## विद्रूपीकरण करणाऱ्या बेकायदेशीर होर्डिंग्जवर कारवाई करण्याची मागणी...



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.०६, शहापूर (ठाणे) :** शहापूर शहरात रस्त्यांवर आणि चौकांमध्ये लावण्यात आलेल्या अनधिकृत बॅनर/होर्डिंग्जमुळे होणारे शहराचे विद्रुपीकरण होत आहे. शहापूर शहरातील मुख्य रस्ते, प्रमुख चौक, वीजवाहक खांब आणि सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बॅनर, फ्लेक्स आणि होर्डिंग लावण्यात आले आहेत, अनधिकृत आणि विनापरवाना लावण्यात आलेल्या बॅनर्समुळे आपल्या ऐतिहासिक व सुंदर शहापूर शहराचे मोठ्या प्रमाणावर विद्रुपीकरण होत आहे. तसेच, हे बॅनर लावताना सुरक्षेच्या नियमांचे अजिबात पालन केले जात नाही. अनेक चौकांमध्ये आणि वळणांवर लावलेल्या मोठ्या बॅनर्समुळे वाहनचालकांचे लक्ष विचलित होऊन अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, तर काही ठिकाणी पादचाऱ्यांना चालणेही कठीण झाले आहे.त्यामुळे एक गंभीर समस्या निर्माण झाली आहे. याच संदर्भात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने शहरातील सर्व मुख्य रस्ते आणि चौकांचे तातडीने सर्वेक्षण करण्यात यावे, सर्व प्रकारचे अनधिकृत आणि विनापरवाना बॅनर, पोस्टर्स तात्काळ जप्त करून हटवण्यात यावेत तसेच संबंधितांवर प्रशासकीय व कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशा विविध मागण्यांचे निवेदन मा. मुख्याधिकारी साहेब,नगरपंचायत शहापूर,यांना देण्यात आले आहे. नगरपंचायत प्रशासनाने या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन पुढील ४ - ५ दिवसांत योग्य ती कारवाई करावी,अन्यथा शहापूर शहर विद्रुपीकरणाच्या विरोधात आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी शिवसेना (उबाठा) स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, ज्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनाची राहील असा इशारा देण्यात आला आहे.

## विजेच्या लपंनडावाने चारठाना येथील नागरिक हैरान



**अक्षराज : अलीम शेख**

**दि.०६, चारठाना (परभणी) :** सतत होणाऱ्या विजेच्या लपंनडावाने चारठाना येथील नागरिक हैराण होऊन गेले आहेत. मागील काही दिवसापासून उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे वातावरनामध्ये उष्णतेची लाट निर्माण झाली असून नागरिक उष्णतेच्या गर्मीने हैरान झाले आहेत आणि त्या मध्ये चारठाना येथे विजेचा लपनडाव सतत सुरूच आहे.

दिवस मध्ये कितेक वेळेस लाईन ही परमिट घेऊन बंद केली जात आहे, चारठाना येथील ३३ र्घी उपकेंद्र येथे चौकशी केली असता सतत उडवा उडवीचे उत्तर भेटत आहे, चारठाना येथील वॉर्ड क्रमांक १ मधील व ि चे फ्यूज हे सतत उडत आहेत, यासह गावातील सर्व डी पी फ्यूज व डीव सतत उडत आहेत, तया कडे महावितरण कंपनी च्या वरिष्ठ अधिकारी याचे कुठलेही लक्ष नसुन चरठाना गावातील नागरिक सतत ये जा करणाऱ्या विजेच्या त्रासून गेले आहेत.

यावरती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देऊन काहीतरी उपाय योजना करावी अशी अपेक्षा चारठाना येथील नागरिक आहेत.

# जनहितच्या दणक्याने प्रशासन झुकले: सीना काठी २ तास वीज सुरू

**एसीमध्ये बिसलरी पितात, मुक्या जनावरांना मारता काय? प्रभाकर देशमुखांचा अधिकाऱ्यांना सवाल...**



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** मोहोळ तालुक्यातील सीना नदीकाठी गेल्या आठ दिवसांपासून महावितरणने २४ तास विद्युत पुरवठा बंद केल्याच्या निषेधार्थ महाराष्ट्र राज्य जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रभाकर भैय्या देशमुख यांच्या नेतृत्वाखाली तहसील कार्यालयासमोर करण्यात आलेल्या एकदिवसीय 'बोंबाबोंब' आंदोलनाची प्रशासनाने तातडीने दखल घेतली आहे. आंदोलनानंतर तहसीलदार सचिन मुळीक व नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी रणजीत कांबळे यांनी महावितरणला सीना नदीकाठी त्वरित २ तास वीजपुरवठा सुरू करण्याचे लेखी आदेश दिले आहेत.

**८ दिवस वीज बंद, जनावरे-पिकांचे हाल**

सीना नदीकाठी महावितरणने गेल्या आठ दिवसांपासून २४ तास वीज बंद केल्याने शेतकऱ्यांसह जनावरांचे पिण्याच्या पाण्यावाचून हाल होत होते. या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी प्रभाकर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली मोहोळ तहसील कार्यालयासमोर 'बोंबाबोंब' आंदोलन छेडण्यात आले.

**एसीत बसून बिसलरी पितात, मुक्या जनावरांना मारता**

आंदोलनस्थळी अधिकाऱ्यांना लेखी पत्र देताना प्रभाकर देशमुख यांनी जाहीरपणे संताप व्यक्त केला. मोठ्या जनावरांचे व शेतकऱ्यांचे पिण्याच्या पाण्यावाचून हाल करू नका. तुम्ही ऑफिसमध्ये एसीमध्ये बसून बिसलरीच्या बाटल्यांचे टोपण उघडून अर्ध्या तासाला गार पाणी पिता आणि मुक्या जनावरांना मारता काय? सीना नदीकाठी जन्माला येणं हा शेतकऱ्यांचा गुन्हा आहे का? असा जळजळीत सवाल देशमुख यांनी उपस्थित केला.

**पाईपलाईन बदलणार, पुलाचीही व्यवस्था...**

वॉटर सप्लायची पाईपलाईन लिकेज होऊन फुटल्याने कोळेगावसह इतर गावांतील नागरिकांना चिखलातून पाणी साचत आहे. याबाबत नगरपरिषदेने दिलेल्या लेखी पत्रात येत्या नियोजन समितीच्या बैठकीत पाईपलाईन बदलाचा प्रस्ताव सादर करणार असल्याचे स्पष्ट केले. तसेच वसे महाराजांच्या शेतात पडलेला पूल महावितरणने योग्य ठिकाणी हलवावा, असे आदेशही देण्यात आले आहेत.

**तोंडाला काळे फासून जाब विचारू : देशमुखांचा इशारा**

मोहोळ तालुक्यातील गावोगावी रात्री ६ ते सकाळी ८ वाजेपर्यंत सिंगल फेज वीजपुरवठा करावा व दिवसा लोडशेडींग ठेवावे. शेतीसाठी फुल क्षमतेने ८ तास थ्री-फेज वीज द्यावी. अन्यथा चार दिवस वाट पाहून महावितरण अधिकाऱ्यांना वेळ आली तर तोंडाला काळे फासून जाब विचारू, असा थेट इशारा देशमुख यांनी आंदोलनात दिला. यावेळी जनहितचे जिल्हाध्यक्ष नाना मोरे, भटके-मुक्त म ेहोळ तालुका अध्यक्ष बिरू वाघमोडे, जनहित ओबीसीचे अध्यक्ष संभाजी म ाळी, उमेश माने, माधव नाना देशमुख, सुरेश पाटील, नानासाहेब देशमुख, अम ोल देशमुख, लक्ष्मण देशमुख, पांडुरंग देशमुख, मानाजी चवरे, आबासाहेब देशमुख, अनिल लेंगरे यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

**कर्जमाफीतील जाचक अटी तातडीने रद्द करा अन्यथा भूमिपुत्र तीव्र आंदोलन करणार**

# म्हसणे सुलतानपूर येथे कर्जमाफीच्या जीआरची होळी!



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** कर्जमाफीसाठी फडणवीस सरकारने काढलेला शासन आदेश फसवा आहे. कर्जमाफी आदेशात अत्यंत जाचक अटी शर्ती लागू करण्यात आल्या असून त्या तातडीने रद्द करण्यात याव्यात अन्यथा भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हा प्रवक्ते सुभाष करंजुले यांनी दिला आहे.

कर्जमाफीत शेतकऱ्यांच्या या फसवणुकी विरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. फडणवीस सरकारने कर्जमाफीचा शासन निर्णय काढून राज्यातील शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याने या निषेधार्थ भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष संतोष वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा संघटक संतोष वाबळे यांच्या नेतृत्वाखाली पारनेर तालुक्यातील म्हसणे - सुलतानपूर येथे कर्जमाफी शासन निर्णयाची होळी करण्यात आली. यावेळी फडणवीस सरकारच्या विरोधात शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करत जाहिर निषेध करत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

तसेच फडणवीस सरकारने कर्जमाफीसाठी लावण्यात आलेल्या अटी रद्द करा, कुठलीही अट न लावता सरसकट कर्जमाफी करा अशी मागणी यावेळी करण्यात आली.

यावेळी संतोष वाबळे म्हणाले की, सरकारने कर्जमाफी करताना, २०१९ मध्ये कर्जमाफी घेतलेले शेतकरी, जरी ते यावेळी थकित असले तरी त्यांना केवळ ५० हजार रुपयांच्या मर्यादेत कर्जमाफी देण्यात येणार आहे. नियमित कर्जदारांना सुद्धा केवळ ५० हजार रुपये देण्यात येणार आहे. त्यांनाही किमान दोन वर्ष नियमित कर्जदार असणे ही अट टाकण्यात आली आहे. अत्यल्प पगारावर राबणाऱ्या सहकार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना कर्जमाफीतून वगळण्यात आले आहे. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्याचे आश्वासन द्यायचे आणि आता २ लाख कर्ज माफ करणार सांगून बहुसंख्य शेतकऱ्यांची केवळ ५० हजारावर बोळवणूक करायची ही अत्यंत संतापजनक गोष्ट असून ही शेतकऱ्यांची घोर फसवणूक असल्याची टीका

भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे जिल्हा संघटक संतोष वाबळे यांनी केली.

या आंदोलनावेळी भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे प्रदेश उपाध्यक्ष बाळशिराम पायमोडे, राज्य संपर्क प्रमुख अशोक आंधळे, तालुका सचिव अन्सार पटेल, वसंत साठे, बापु गट ( मेजर ), गोरख पठारे, धोंडीभाऊ गुंड, बाळासाहेब जंबे, आनंदा गुंड, दामोदर गुंड, दादाभाऊ बालवे, लक्ष्मण पठारे, पोपट जंबे, हरिभाऊ गुंड, सुरेश गुंड, बापू गुंड, रामदास बालवे, पोपट पालवे, रोहन पठारे, संतोष तरटे,दगडू तरटे, साहेबराव बागल, संदीप जंबे, मल्हारी रनशुर, बबन जंबे, बाबाजी पठारे, गंगाधर बालवे, सतीश बागल, सुनील बालवे, शिवाजी बालवे, शिवाजी जंबे, कैलास गुंड, रावसाहेब जंब यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिंदे फाऊंडेशनच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०६, महाबळेश्वर :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राधानगर (माचुतर) येथे शिंदे फाऊंडेशनच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला ग्रामस्थ, विद्यार्थी व म ान्यवरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

वाढते जागतिक तापमान, हवामान बदल, अनियमित पाऊस, पाण्याची टंचाई आणि नैसर्गिक संसाधनांवरील वाढता ताण या गंभीर समस्यांच्या पार्श्वभूमीवर हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास उद्योजक राजेंद्र कुलकर्णी, फाऊंडेशनचे अध्यक्ष डी. एल. शिंदे, भगवान शिंदे, डॉ. नंदकुमार शिंदे, सचिन शिंदे, कांताराम शिंदे, दिलीप शिंदे, गणेश शिंदे, नितीन शिंदे, सुभाष कदम, तुषार शिंदे, अरुण शिंदे, प्रशांत शिंदे, दिनेश शिंदे, सुरेश शिंदे, शशिकांत शिंदे, संतोष शिंदे, प्राथमि क शिक्षक जाधव सर, अनिल सपकाळ, शाळेतील विद्यार्थी तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी अध्यक्ष डी. एल. शिंदे यांनी पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाबरोबरच वृक्षांचे संगोपन व संरक्षणही तितकेच



महत्त्वाचे असल्याचे सांगितले. फाऊंडेशनच्या माध्यमातून यावर्षी किम ान ५०० वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन करण्याचा संकल्प करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

भगवान शिंदे यांनी मार्गदर्शन करताना हवामान बदलाचे वाढते परिणाम, अतिवृष्टी, दुष्काळ, जैवविविधतेचा ऱ्हास आणि वाढते तापमान यांसारख्या आव्हानांचा उल्लेख केला. प्रत्येक नागरिकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात उपस्थित सर्व सभासद व मान्यवरांनी फाऊंडेशनच्या पर्यावरणपूरक उपक्रमाला पूर्ण पाठिंबा दर्शवित समाजाच्या प्रगतीसाठी आणि पर्यावरण संरक्षणासाठी भविष्यातही सक्रिय योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला. वृक्षारोपणासोबतच पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करून हरित, स्वच्छ आणि शाश्वत भविष्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रम

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०६, चंद्रपूर :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मेरा युवा भारत (युवा व खेल मंत्रालय भारत सरकार) यांच्या वतीने देवाडा ग्रामपंचायत परिसरात सामाजिक कार्यकर्ते संजय ढवस यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

वनसंवर्धन मानव जीवन समृद्धीसाठी आवश्यक आहे. परंतु



कालांतराने मात्र आपण वनांचे म हत्व जाणून घेण्यात व त्यांचे संवर्धन करण्यामध्ये कुठे तरी कमी पडलोत. भारतात सुद्धा मोठ्या प्रमाणात औद्योगिक कारणा करिता वृक्ष तोड चालू झाली.

आपल्या आजोबा- पणजोबाने लावलेली झाडे व निसर्गाने उगविलेली झाडे ही एक घर बसल्या कोणतीही मेहनत न घेता एक एक मोठे उत्पन्नाचे साधन आहे.

जागतिक तापमान वाढ, हवाम ानात होणाऱ्या बदलावर नियंत्रण ठेवण्यासाठी वृक्षलागवड व संगोपन गरजेचे असल्याचे मत संजय ढवस यांनी व्यक्त व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन ॲड. देवा पाचभाई तर आभार कोमल मोहितकर यांनी मानले.

यावेळी प्रमुख उपस्थिती उपसरपंच विशाल रामटेके, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष प्रशांत ताजने , सामाजिक कार्यकर्ते विलास म ाथनकर, सतीश ढोके अश्विन भगत व गावातील नागरिक उपस्थित होते.

# आषाढी यात्रा; पालखी मार्ग व तळांच्या ठिकाणी गतवर्षीपेक्षा दीडपट सुविधेत वाढ

## पालखी सोहळा प्रमुखांच्या सर्व सूचनांची वारीपूर्वी अंमलबजावणी करण्यात येणार

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.०६, पंढरपूर :** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी होणार असून, आषाढी यात्रेसाठी पूर्वीच पालखी मार्ग, तळ आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पालखी सोहळा प्रमुख, विश्वस्तांकडून काही मागण्या व सूचना करण्यात आलेल्या होत्या. त्या सूचनांची अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून ८० टक्के कामे पूर्णत्वाकडे येत आहेत. आषाढी यात्रेसाठी पालखी सोहळ्यांसोबत येणाऱ्या दिंड्या व भाविकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. भाविकांना तात्काळ सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी पालखी मार्ग व तळांच्या ठिकाणी तसेच पंढरपूरमध्ये गतवर्षीपेक्षा दीडपट अधिक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी सांगितले.




आषाढी यात्रेच्या पूर्वतयारीबाबत केबीपी कॉलेज, पंढरपूर येथे दहा मानाच्या पालख्यांचे विश्वस्त व सोहळा प्रमुख यांच्या सोबत बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. म्हणाले, आषाढी वारीच्या अनुषंगाने वारकरी भाविकांना सोयी-सुविधा देण्यासाठी प्रशासनाकडून विविध कामे करण्यात येतात. विधानपरिषद निवडणुकीची आचारसंहिता असल्याने काही कामांच्या निविदाबाबत निवडणूक आयोगाची परवानगी घ्यावी लागते. ती परवानगी निवडणूक आयोगाकडून मिळालेली आहे. त्यामुळे आवश्यक सर्व कामे पालखी सोहळे जिल्ह्यात दाखल होण्यापूर्वी करण्यात येणार आहेत.

पालखी तळाच्या ठिकाणी मुरमीकरण करण्यात येणार आहे. वाढीव पालखी तळाबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे. पालखी मार्गावर व तळांवर सुलभ शौचालय, स्नानगृह, वॉटरप्रूफ मंडप, रुग्णवाहिका आदींची संख्या वाढविण्यात येणार आहे.

पालखी मार्गावरील पेट्रोल पंपांवर सोहळ्यासोबत येणाऱ्या वाहनांना पेट्रोल/डिझेल उपलब्ध होण्यासाठी संबंधितांना तात्काळ सूचना देण्यात येणार असून गॅसचा पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घेण्यात येईल.

भाविकांच्या सुरक्षेसाठी आपत्ती व्यवस्थापन आराखड्यानुसार नियोजन करण्यात येणार आहे. आषाढी यात्रा सोहळा कालावधीत पालखी सोहळ्यासह वारकरी भाविकांना कोणतीही अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता प्रशासनाकडून घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन म्हणाले, पालखी मार्ग व तळांच्या ठिकाणी जर्मन हँगरच्या सुविधेत वाढ करण्यात येणार असून, पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या बैलजोडी तसेच घोडे यांच्या निवाऱ्याची व्यवस्था करण्यात येईल. पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पालखी सोहळे संबंधित मुक्कामाच्या ठिकाणावरून पुढे गेल्यानंतर तात्काळ स्वच्छता करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

गोपाळकाला झाल्यानंतर सर्व मानाच्या पालख्या पूर्णिमेला श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दाखल होतात आणि सर्व संतांच्या पादुका विठ्ठल दर्शनासाठी नेण्यात येतात. यावेळी संत देव भेट सोहळ्याला होणारी गर्दी लक्षात घेऊन प्रथा-परंपरेनुसार योग्य नियोजन करण्यात येणार असल्याचे मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगितले.

यावेळी बैठकीत मानाच्या पालख्यांचे विश्वस्त व सोहळा प्रमुख यांनी पुढील सूचना केल्या: पालखी सोहळ्यासोबत दिवसेंदिवस दिंड्यांची संख्या वाढत असल्याने काही ठिकाणी पालकी तळ कमी पडत आहेत; त्यामुळे ते तळ वाढवून देण्यात यावेत. पालखी सोहळ्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा. टँकरची संख्या वाढवावी. पालखी सोहळे पालखी मार्गावरून जात असताना वाहतुकीचे नियोजन करण्यात यावे. तसेच पालखी तळांवर मुरमीकरण करावे.

गतवर्षीच्या पालखी सोहळ्यासाठी पालखी मार्गावर, तळांवर तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी प्रशासनाकडून करण्यात आलेल्या सोयी-सुविधांबाबत पालखी सोहळा प्रमुखांनी समाधान व्यक्त केले.

# थोडक्यात

## मंद्रूपची रोहिणी कुंभार बनली 'एक दिवसाची बालसरपंच'




**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०६, सोलापूर :** मंद्रूप येथील शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण झालेली कु. रोहिणी कुंभार हिने आज गुरुवारी 'एक दिवसाची प्रतीकात्मक बालसरपंच' म्हणून काम पाहिले. यावेळी तिने विविध शासकीय कार्यालयांना भेटी देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. गावच्या सरपंच अनिता कोरे यांच्यासह ग्रामस्थांनी तिचे मोठ्या उत्साहात स्वागत केले.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव आणि प्रशासनाविषयीची समज विकसित करण्याच्या उद्देशाने सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या वतीने राबविण्यात आलेल्या नाविन्यपूर्ण 'एक दिवसाचे प्रतीकात्मक बालसरपंच' या उपक्रमांतर्गत मंद्रूप येथील विद्यार्थिनी कु. रोहिणी शिवानंद कुंभार हिची निवड करण्यात आली होती. मंद्रूप येथील

लोकसेवा विद्यालयात शिक्षण घेत असलेल्या कु. रोहिणी कुंभार हिने आपल्या शैक्षणिक गुणवत्तेच्या बळावर हा सन्मान प्राप्त केला. आज ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित कार्यक्रमात तिने एक दिवसाचे प्रतीकात्मक बालसरपंच म्हणून पदभार स्वीकारला. यावेळी ग्रामपंचायतीच्या विविध विभागांची माहिती तिला देण्यात आली. तसेच ग्रामविकासाच्या कामकाजाची ओळख करून देण्यात आली.

यावेळी बालसरपंच म्हणून काम करताना रोहिणीने ग्रामपंचायतीच्या दैनंदिन कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. गावातील नागरिकांच्या समस्या, ग्रामविकासाच्या योजना, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य आणि शिक्षणाशी संबंधित विषयांची माहिती तिने जाणून घेतली. प्रशासनाची जबाबदारी आणि लोकप्रतिनिधींची भूमिका समजून घेण्याची संधी तिला या उपक्रमामुळे मिळाली.

याचबरोबर रोहिणीने तलाठी कार्यालय, पशुवैद्यकीय दवाखाना तसेच विविध शासकीय कार्यालयांना भेटी देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. महसूल विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि इतर कार्यालयांमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तिला त्यांच्या विभागाच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती दिली. शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत कशा पोहोचतात, प्रशासनाची साखळी कशी कार्य करते आणि शासकीय यंत्रणा जनतेसाठी कशाप्रकारे काम करते याची माहिती तिने प्रत्यक्ष पाहून घेतली.

रोहिणीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल ग्रामपंचायतीच्या वतीने तिचा व आई-वडिलांचा तसेच शाळेच्या मुख्याध्यापकांचा सरपंच अनिता कोरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामसेवक कुशाबा इंगळे, उपसरपंच भगवान व्हनमाने, ग्रामपंचायत सदस्य सुधाकर कोरे, अंकिता कुंभार, शाळेचे मुख्याध्यापक बसवराज घाटे, पर्यवेक्षक शिवपुत्र म्हेत्रे , राजकुमार बिदरकोटे, नागनाथ धनाळे, सोमशंकर म्हेत्रे, श्रीकांत मुंजे सोहळ्यात गावातील मान्यवर, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रियेतील दिरंगाई!

## आमदार काशिनाथ दातेंनी घेतली गंभीर दखल...

पारनेर ग्रामीण रुग्णालय पोहोचल्यानंतर उपस्थित नातेवाईक व नागरिकांशी संवाद साधून त्यांची व्यथा जाणून घेतली, त्यानंतर पारनेर ग्रामीण रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिक्षक डॉ. सतीश लोंढे यांना शवविच्छेदन करण्यात विलंब झाल्याबद्दल जाब विचारला, जिल्ह्याचे शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्याशी दूरध्वनीवरून त्वरित संपर्क साधत संबंधित शवविच्छेदन प्रक्रिया कोणत्याही विलंबाशिवाय पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागणे ही गंभीर बाब असून, आपल्या कर्तव्यात कुचराई करणाऱ्या संबंधित कर्मचाऱ्यांवर योग्य ती चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशा स्पष्ट सूचनाही दिल्या.

**– आ. काशिनाथ दाते (विधानसभा सदस्य)**




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०६, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील हिवरे कोरडा येथील रमेश बाबासाहेब शेळके यांच्या निधनानंतर त्यांचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पारनेर येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला होता. मात्र तालुक्याचे मुख्य ठिकाण असलेल्या पारनेर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन प्रक्रियेस होत असलेल्या विलंबामुळे नातेवाईकांसह उपस्थित नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे परिस्थिती अधिक गंभीर बनत असल्याची माहिती मिळताच पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी तातडीने ग्रामीण रुग्णालयात धाव घेत परिस्थितीची पाहणी केली.

सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणीच्या वेळी तत्परतेने धाव घेऊन प्रशासनाला जबाबदारीची जाणीव करून देणारी आमदार काशिनाथ दाते सरांची कार्यशैली यावेळी पुन्हा एकदा दिसून आली. त्यांच्या तातडीच्या हस्तक्षेपामुळे संबंधित प्रक्रिया वेगाने मार्गी लागली असून उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले. राष्ट्रवादी कॉंग्रेस तालुका उपाध्यक्ष प्रितेश पानमंद यावेळी उपस्थित होते. जनतेच्या प्रश्नांवर तत्काळ प्रतिसाद देणे आणि प्रशासनाला जबाबदार धरणे, हीच आमदार काशिनाथ दाते सर यांच्या लोकाभिमुख नेतृत्वाची खरी ओळख असल्याची भावना यावेळी नागरिकांमधून व्यक्त करण्यात आली.

## किन्हवली पोलिसांची धडक कारवाई : हातभट्टी उद्ध्वस्त



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०६, शहापूर (ठाणे) :** किन्हवली परिसरात बेकायदेशीर हातभट्टीवर पोलिसांनी मोठी कारवाई करत अवैध दारू व्यवसायाला जोरदार धक्का दिला आहे.

आज रोजी किन्हवली पोलीस स्टेशनच्या स्टाफची दोन स्वतंत्र पथके तयार करण्यात आली होती. या पथकांनी खरपत खरांगण गावाच्या शिवारातील शाई नदीच्या किनारी मालद कांबा गावाच्या शिवारातील शाई नदीच्या किनारीया ठिकाणी छापे टाकले. कारवाईदरम्यान हातभट्टीद्वारे दारू तयार करणाऱ्या अड्ड्यांवर पोलिसांनी धाड टाकून मोठ्या प्रमाणात हातभट्टीचे साहित्य तसेच दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा वॉश (मिश्रण) जप्त केला. जप्त केलेले सर्व साहित्य घटनास्थळीच नष्ट करण्यात आले. या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.ही कारवाई ए.पी.आय खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली सो. पोहवा यशवंतराव, पोशी शेलवले, पोशी गवारी व पोशी शिंपी यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. या धडक कारवाईमुळे परिसरातील अवैध दारू व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक नागरिकांकडून पोलिसांच्या या कामगिरीचे स्वागत करण्यात येत आहे.

# बीएलओ-जनगणनेत कर्तव्य बजावताना शिक्षकांचा मृत्यू;

## कुटुंबाला ५० लाख द्या – आमदार म्हात्रेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि,०६, ठाणे :** तीव्र उन्हाळ्यात बीएलओ आणि जनगणनेच्या कामासाठी राबणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला आहे. याच कामादरम्यान काही कर्मचारी आजारी पडून रुग्णालयात दाखल झाले आहेत, तर काहींचा मृत्यू झाला आहे. कर्तव्य बजावताना मृत्यू झालेल्या शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाला प्रत्येकी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी आक्रमक मागणी कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

बुधवार दि. ०३ जून २०२६ रोजी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी राज्याचे मुख्यमंत्री आणि निवडणूक आयोगाला निवेदन दिले. निवेदनात त्यांनी म्हटले की, सध्या राज्यात एसआयआर आणि जनगणनेचे काम जोमाने सुरू आहे. जनगणनेचे काम शिक्षकांनी करू नये, यासाठी उच्च न्यायालयाने बावीस मे रोजी सुनावणीमध्ये स्पष्ट निर्देश दिले आहेत. तरीही काही शिक्षकांना नोकरीची भीती दाखवून त्यांच्याकडून हे काम करून घेतले जात आहे.

**कामाचा ताण, जीवावर बेतले...**

आमदार म्हात्रे म्हणाले की, उन्हाळ्यात बीएलओ आणि जनगणनेचे काम करताना अनेक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आजारी पडून हॉस्पिटलमध्ये दाखल झाले आहेत. तर काहींचा मृत्यू झाला आहे. कामाचा प्रचंड ताण, मानसिक आणि शारीरिक त्रास सहन करावा लागत असल्याने कर्मचाऱ्यांना एकाच वेळी दोन जबाबदाऱ्या पार पाडणे कठीण झाले आहे.

**सरकारने तातडीने मदत करावी**

कर्तव्य बजावत असताना मृत्यू झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी पन्नास लाख रुपयांची आर्थिक मदत शासनाने जाहीर करावी. जे कर्मचारी कर्तव्य बजावत असताना रुग्णालयात दाखल आहेत त्यांचा खर्चही शासनाने द्यावा अशी ठाम मागणी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी केली आहे.

हे काम करताना शिक्षकांवर दुहेरी ताण येत आहे. त्यामुळे याचा गांभीर्याने विचार करण्याची गरज असल्याचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे.

# कोक गावाजवळील पिंपरी फाट्यावर काळाचा घाला ; एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि,०६, जिंतूर :** जिंतूर-परभणी महामार्गावरील कोके गावाजवळील पिंपरी फाट्यावर शनिवारी सायंकाळी झालेल्या भीषण अपघातात जिंतूर तालुक्यातील शेवडी येथील एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. एसटी बस आणि दुचाकी यांच्यात झालेल्या भीषण धडकेत तीन निरपराध जीवांचा दुर्दैवी अंत झाला.मृतांमध्ये भगवान बळीराम काळे (वय ५०), कुसाबाई भगवान काळे (वय ४०) आणि शिवम गजानन काळे (वय १२, रा. शेवडी, ता. जिंतूर) यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, काळे कुटुंबीय शनिवारी सकाळी आपल्या मेव्हण्याच्या घरी कौडगाव येथे धोंडे जेवणासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपल्यानंतर ते दुचाकीवरून पिंपरी मार्गे शेवडीकडे परतत होते. यावेळी जिंतूरहून परभणीकडे जाणाऱ्या एमएच १३ सीयू ७८३३ क्रमांकाच्या एसटी बसची आणि त्यांच्या दुचाकीची कोके गावाजवळील पिंपरी फाट्यावर समोरासमोर भीषण धडक झाली.




धडक इतकी जोरदार होती की दुचाकीचा अक्षरशः चक्काचूर झाला आणि भगवान काळे, कुसाबाई काळे व १२ वर्षीय शिवम काळे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. महामार्गावर नागरिकांची मोठी गर्दी जमली.

**आनंदाचा दिवस ठरला दुःखाचा**

नातेवाईकांच्या घरी कौटुंबिक कार्यक्रमासाठी गेलेले काळे कुटुंब आनंदाने परतत होते. मात्र नियतीला काही वेगळेच मान्य होते. काही क्षणांतच हसते-खेळते कुटुंब काळाच्या पडद्याआड गेले. या घटनेमुळे शेवडी गावावर शोककळा पसरली असून गावातील नागरिकांना मोठा धक्का बसला आहे.

**पिंपरी फाटा पुन्हा चर्चेत**

कोक गावाजवळील पिंपरी फाटा हा अपघातप्रवण ठिकाण म्हणून ओळखला जातो. या ठिकाणी यापूर्वीही अनेक अपघात घडले असून सुरक्षा उपाययोजनांचा अभाव असल्याची तक्रार नागरिक सातत्याने करत आहेत. गतिरोधक, इशारा फलक आणि वाहतूक नियंत्रणाच्या उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात, अशी मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

**शेवडी गावावर शोककळा**

एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याने शेवडी गावात शोककळा पसरली आहे. गावातील अनेकांनी घटनास्थळी धाव घेतली. नातेवाईकांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता. संपूर्ण गावात हळहळ व्यक्त होत असून या दुर्दैवी घटनेबद्दल सर्व स्तरातून शोक व्यक्त केला जात आहे.